


# Office of The Municipal Council Chimur

## Dist-Chandrapur 442903

### ( Fire Officer, Maharashtra Fire Service )



---

**No.MFS/FO/2025-26/05** **Date:- 05/03/2026**

## अंतिम अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र

प्रती,

St.Anne's Convent
Plot No.1 & 2 S.No.276/02
Mouza-Khanji,Tah-Warora
Dist.Chandrapur.

**विषय : अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

संदर्भ : १) ना हरकत मिळविण्याकरिता आपले अर्ज दि. १९ /०१/२०२६ रोजीचे.

२) तात्पुरते स्वरुपाची अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र दि.२६/१०/२०२३ रोजीचे.

३) मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय ,महाराष्ट्र शासन मुंबई यांच्याकडून प्राप्त नोंदणीकृत लायसन्स धारक मे.सन इंडस्ट्रीयल सर्विसेस, प्लॉट क्र.ई -४४, एम.आय.डी.सी.दाताळा रोड,चंद्रपूर License No.MFS-LA/RF-02/ RF-03 यांनी सादर केलेल्या दि.०८/१०/२०२५ रोजीचा Form A

४) इमारतीचे विकासक ST.Anne's Convent यांनी अग्निशमन यंत्रणा लायसन्स अभिकरण यांचे मार्फत पुढील ३ वर्षे कार्यान्वित ठेवणे बाबत सादर केलेले दिनांक ३०/१२/२०२५ रोजीचे हमी पत्र

५) अग्निशमन यंत्रणा अंतिम तपासणी दि.२०/०१/२०२६ रोजी.

प्रमाणित करण्यात येते कि. ST.Anne's Convent Plot No.1 & 2 S.No.276/02 Mouza-Khanji,Tah-Warora,Dist.Chandrapur यांनी विद्यमान व प्रस्तावित तळ + 2 मजली शैक्षणिक इमारती करिता प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर एकुण इमारतीचे क्षेत्रफळ (७६६४.५६) इतके असून असे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ५१४९.१६ चौ.मी इतके आहे. सदर तळापासून इमारत क्र.०१ -११.४० व इमारत क्र.०२- १०.८० मीटर उंच असून प्रस्तावित इमारतीस संदर्भ क्र.२ अन्वये अग्निशमन विभाग मार्फत तात्पुरते स्वरुपाची अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ १ चे विनंती अर्जानुसार व संदर्भ क्र.३ चे महाराष्ट्र अग्निशमन सेवा मुंबई यांचे प्राधिकृत अभिकर्ता/संस्थेद्वारे इमारतीचे अग्निसुरक्षा ऑडीट करून **शैक्षणिक** या व्यवसायासाठी अग्निशमन विभागाचे अंतिम ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे. त्यानुसार खालील नियम व अटी शर्तीच्या आधीन राहून आपणांस ना हरकत प्रदान करण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ अन्वये आपणास आगप्रतिबंधक उपाययोजना व यंत्रणा यामधील तरतुदींचे अनुपालन करण्यात यावे व NBC -२०१६ नियमांची पूर्तता करण्यात यावी.

PRINCIPAL
ST. ANNE'S PUBLIC SCHOOL
ANANDWAN P.O. 442914

Sr. Salma
MANAGER
ST. ANNE'S PUBLIC SCHOOL
ANANDWAN P.O. 442914
WARORA, CHANDRAPUR DIST

२) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्निसुरक्षा व्यवस्था करावी लागेल. पाण्याची टाकी नेहमीच पूर्ण भरलेली असावी. आवश्यक त्या ठिकाणी धुम्रपान निषेध फलक लावावे व महत्वाचे दूरध्वनी क्रमांक उदा.पोलीस नियंत्रण कक्ष ,अग्निशमन दल, अँम्बुलन्स ई.चा फलक दर्शनीय ठिकाणी लावावे.

३) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले लायसन्स धारक यांच्या कडून जानेवारी व जुलै असे वर्षातून दोन वेळा करून घेणे बंधनकारक राहील.

४) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी प्रशिक्षण देऊन माहिती देण्यात यावे तसेच फायर मॉक ड्रिल घेण्यात यावा.

५) आगप्रतिबंधक उपाययोजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी सर्व विद्युत उपकरणे खात्रीच्या अभिकर्त्याकडून तपासून घ्यावेत. तसेच प्रत्येक वर्षी इलेट्रीक ऑडीट करणे बंधनकारक राहील.

६) सदर इमारतीमध्ये आपत्कालीन परिस्थितीकरिता पाण्याची टाकी हि वेगळी असणे बंधनकारक राहील त्याचा वापर फक्त आपत्कालीन परिस्थितीमध्येच करण्यात यावा आणि ती पाण्याची टाकी नेहमीच पूर्ण भरलेली असावी. त्या पाण्याचा टाकीचा वापर दुसऱ्या कोणत्याच कामाकरिता करू नये याची दक्षता घ्यावी.

७) इमारतीमध्ये मध्ये लावण्यात आलेले Fire Extinguisher दरवर्षी रिफिलिंग करण्यात यावे. तसेच प्रत्येक महिन्यात सर्व अग्निशमन उपकरण चालू स्थितीत आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेत त्रुटी आढल्यास तत्काळ दुरुस्ती करण्यात यावे.

८) आगप्रतिबंधक उपाययोजना बाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमन दल मार्फत केव्हाही करता येईल. अग्निशमन प्रमाणपत्र सोबत इतर विभागाचे आवश्यक ते परवाने घ्यावेत.

**९) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राची वैधता १ वर्षाची राहील.**

१०) वरील प्रमाणे व्यवस्थे अभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

११) दरवर्षी नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

१२) सदर अधिनियमाच्या किंवा त्यासाठी केलेल्या नियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या उल्लंघनाच्या या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या तरतुदीन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाची किंवा नोटीसीच्या किंवा निर्देशाच्या आवश्यकतेनुसार अनुपालन करण्यात कसूर केल्यास संबंधित प्रकरणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित अधिनियम २०२३ अन्वये नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३) वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले ना हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१४) मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय ,महाराष्ट्र शासन मुंबई यांच्याकडून प्राप्त नोंदणीकृत लायसन्स धारक में.सन इंडस्ट्रीयल सर्विसेस, प्लॉट क्र.ई -४४,एम.आय.डी.सी.दाताळा रोड,चंद्रपूर, License No.MFS-LA/RF-02/ RF-03 यांनी सादर केलेल्या दि. ०८/१०/२०२५ रोजीचा Form A ला अनुसरून अंतिम अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

टीप : १) शासन नियमानुसार फार्म बी दर सहा महिन्याने जमा /सादर करणे अनिवार्य आहे.

OFFICE OF THE MAHARASHTRA FIRE SERVICE
Regd No 05
Date 05/02/26
Place Chandrapur

( मि.प्रि.डुकरे )
अग्निशमन अधिकारी/नामनिर्देशित अधिकारी
महाराष्ट्र अग्निशमन सेवा
जि.चंद्रपूर

PRINCIPAL
ST. ANNE'S PUBLIC SCHOOL
ANANDWAN P.O. 442 914
WARORA, CHANDRAPUR DIST

MANAGER
ST. ANNE'S PUBLIC SCHOOL
ANANDWAN P.O. 442 914
WARORA, CHANDRAPUR DIST